
ISSN 2394-5303

International Multilingual Research Journal
Issue-18, Vol-01, June 2016

# Printing Area



Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

16) Friendbook: A Semantic based Friend Recommendation System for Social Networks
Prof.Sabera Begum Kardi-Khadeer Pasha-Channashetty-Ganesh.R.Kesare, Kalaburagi || 79

17) सोशल मिडियाचा समाजावरील परिणाम
डॉ. पी.एम.कडुकर, परेल, मुंबई || 88

18) संत कबीरांचा मानवोपदेश
प्रा. डॉ. श्याम मोहरकर, चंद्रपूर || 92

19) महाराष्ट्रातील शाहिरी परंपरा
प्रशांत रामराव सातपुते, जि.वर्धा, महाराष्ट्र || 96

20) पाश्चात्य विचारवंतांचा कादंबरी विचार
डॉ. सीमा धवरे, यवतमाळ. || 103

21) नदिकाठचे समाजाचे लोकजीवन व लोकसंस्कृती
प्रा. जाधव तुकाराम भिवसेन, देवटाकळी ता.शेवगाव, जि.अहमदनगर || 105

22) महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार
प्रा.डॉ.श्याम मोहरकर, चंद्रपूर || 107

23) भारतातील राजकीय पक्ष आणि संघराज्य
प्रा. डॉ. लहाडे रत्नाकर बाबुराव, देगलूर. || 111

24) संघर्षशिल नेतृत्वाची वाटचाल
मुंडे परमेश्वर वैजनाथ, नांदेड, महाराष्ट्र || 119

25) आंतरविवाह : एक समाजशास्त्रीय पाहणी
प्रा.सावंत एस.डी., गडहिंग्लज ता.गडहिंग्लज जि.कोल्हापूर || 125

26) राजकीय नेतृत्वाची संकल्पना आणि आधुनिक भारतीय नेतृत्व
डॉ. सिध्देश्वर सटाले, गेवराई || 126

27) कृष्णा सोबती के स्त्री पात्रों का अध्ययन चुनिंदा उपन्यासों के सन्दर्भ में:.......
रेनू आनन्द, इलाहाबाद || 129

28) संचार और सामाजिक संगठन: एक विमर्श
अनन्त सिंह जेलियांग, मुमफोर्डगंज, अलाहाबाद || 132

29) दतिया जिले में कृषि भूमि उपयोग: एक विश्लेषणात्मक अध्ययन
डॉ. भावना भटनागर, भिण्ड (म.प्र.) || 138

30) भारत अर्थ मूवर्स लिमिटेड व हिन्दुस्तान कॉपर लिमिटेड में स्कन्ध प्रबन्धन का तुलनात्मक अध्ययन
डा. संजय जैन—कु. ज्योति चौकसे, भोपाल (म.प्र.) || 141




http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

Scanned with CamScanner

ISSN: 2394 5303 | Impact Factor 3.024(IIJIF) | Printing Area International Research journal | June 2016 Issue-18, Vol-01 | 0126

आंतरविवाह आहे म्हणून आंतरविवाहितांशी संबंध ठेवत नाहीत. आंतरविवाह असल्यामुळे आंतरविवाहितांच्या नातेवाईकांकडून, जातीगटाकडून आंतरविवाहितांच्या मूळ कुटुंबाला बहिष्कृत केले जाते. कालांतराने संबंध सुधारले तरीही सांस्कृतिक अथवा धार्मिक स्वरुपाच्या कार्यक्रमांना स्व-जातीगटाकडून, नातेवाईकांकडून या इतर जातीगटाकडून मिळालेल्या निमंत्रणावरुन उपस्थित राहण्याचा प्रसंग आला तर वाईट अनुभव येतात. प्रसंगी अपमानित होण्याची भिती वाटते कारण काही लोक अप्रत्यक्ष, टीकात्मक आंतरविवाहितांना बोलतात. त्यामुळे त्यांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. स्वत:च्या आंतरविवाहामुळे मूळकुटुंबातील अंतरविवाहीत व्यक्तींच्या सख्या भावंडाच्या विवाहाचा प्रश्न निर्माण होतो. कौटुंबिक जीवनातही अनेक निर्णयाप्रती संघर्ष उद्‌भवतात उदा. वैचारिक मतभेदामुळे, दोघांच्या खानपान, रीतिरिवाजातील पध्दतील फरक असल्यामुळे, मुलांच्या जडण-घडणीबाबत, धार्मिक सण-उत्सव साजरे करण्यावरुन आंतरविवाहित व्यक्तींमध्ये संघर्ष निर्माण होऊ शकतो. त्याचबरोबर एकमेकांच्या जातीचा उल्लेख करुन मानसिक खच्चीकरण करण्याचे प्रसंग घडतात. त्यामुळे वैवाहिक-सामाजिक जीवनातील संघर्ष टाळण्यासाठी घटस्फोटाचा विचारही मनात येऊ शकतो.

अपत्य संगोपनाबाबतही अनेक समस्या निर्माण होतात. अपत्यांच्या सहजीवनात अनेक अडथळे येतात. त्याचबरोबर समवयस्काबरोबर व्यवस्थित समायोजन साधता येत नाही. आंतरविवाह केलेल्या व्यक्तीला आणि त्यांच्या मुळ कुटुंबियांना जातपंचायतीकडून जाती बहिष्कृत करणे, रोटी-बेटी व्यवहार बंद करणे, अंत्यविधीत येण्यास प्रतिबंध करणे, विवाहास येण्यास प्रतिबंध करणे, आर्थिक दंड ठोठवणे, या शिक्षा बरोबरच कधी-कधी मृत्यूदंडाचीही शिक्षा दिली जाते. आंतरविवाह करणाऱ्या व्यक्तींच्या अनेक समस्या आहेत. त्यांचे प्रश्न हे सामाजिक प्रश्न म्हणून अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. आंतरविवाहाच्या घटनांची नोंद प्रसारमाध्यमे घेतात त्यामुळे आंतरविवाहितांना मुळकुटुंबाकडून, नातेवाईकांकडून आणि समाजाकडून उद्‌भवलेल्या समस्यांचा वेळोवेळी वृत्तपत्रात, वृत्तवाहिनीवर, दुरचित्रवाहिनीवर चर्चा केलेली आढळून येते. याबाबत अध्ययन केल्यानंतर आंतरविवाह करणाऱ्या मागासजातीतील व्यक्तिला त्रास होतो. तसाच उच्च जातीतील आंतरविवाह केलेल्या व्यक्तिलाही त्रास झाल्याचे निदर्शनास येते.

**संदर्भ सूची :**


- आगलावे प्रदीप (२००८): 'समाजशास्त्र', साईनाथ प्रकाशन, नागपूर पृ. १६५
- www.the free dictionary.com dictionary/cambridge.org
- Cannan C.T. (1969) : 'Intercaste & Inter Community Marriage in India' Allied Publications, Bombay,p.6-7.
- कुलकर्णी एम.जी. (१९७५) :'भारतीय समाजव्यवस्था' परिमल प्रकाशन, औरंगाबाद, पृ. १८६


26

# राजकीय नेतृत्वाची संकल्पना आणि आधुनिक भारतीय नेतृत्व


डॉ. सिध्देश्वर सटाले
राज्यशास्त्र विभागप्रमुख
र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई


**नेतृत्व संकल्पनेचा अर्थ :-**

'नेतृत्व' व 'राजकीय' या दोन्ही संकल्पनाचा वेगवेगळा विचार केला तरी राजकीय या व्यापक संज्ञेमुळे 'नेतृत्व' या संज्ञेला वेगळी झळाळी प्राप्त झाली आहे. 'नेतृत्व' हे राजकीय आहे अथवा गैर-राजकीय असा स्पष्टपणे फरक करणे सोपे नाही. कित्येक वेळा आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक तथा चित्रपट अशा अनेक क्षेत्रातील पुढाऱ्यांना निवडणूकीत उभे राहण्यासाठी राजकीय पक्षांची तिकीटे (उमेदवारी) मिळते. त्यांच्या क्षेत्रातील लोकप्रियतमुळे ते निवडून येतात. व ते राजकीय नेतृत्व बनतात. यावरुन नेता अथवा पुढारी हा शब्द सर्वसामान्य अर्थाने राजकीय नेतृत्वासाठी वापरला जातो. 'नेतृत्व' ही संज्ञा देखिल अपरिमीत आहे. कारण प्राचिण काळामधल्या राजापासून तर वर्तमानकाळातील राजनेत्यापर्यंत सर्वांचा यात समावेश होतो.

**व्याख्या :-**

'नेतृत्व' या संकल्पनेबद्दल विचारवंतामध्ये एकमत नाही. त्यामुळे व्याख्येमध्ये देखिल भिन्नता आहे. जितके विचारवंत तितक्या व्याख्या आहेत. जेम्स मॅक, ग्रागर लर्न्स ने अशा १३० व्याख्यांचा उल्लेख केला आहे. त्यातील प्रमुख व्याख्यांचा उल्लेख केला आहे. त्यातील प्रमुख व्याख्यांचा उल्लेख खालील प्रमाणे करता येईल.

वेबस्टर ने एक व्यक्ती समजून नेतृत्वाची व्याख्या केली आहे. त्याच्या मते, "नेतृत्व म्हणजे अशी व्यक्ती, जी समुहाला निर्देशित करते, अग्रांकित करते अथवा प्रमुख म्हणून मार्गदर्शन करते".

मॅक्सवेबरने नेता आणि नेतृत्व या शब्दात फरक करुन सांगितले की, "स्वत:च्या व्यक्तीगत गुणांच्याद्वारे त्याला प्राप्त



Scanned with CamScanner

होणाऱ्या साधनस्त्रोत ह्यांच्यावरील नियंत्रणामुळे जो समूहातील लोकांना प्रयोजित तथा प्रोत्साहित करुन त्यांच्या वर्तनाला प्रभावित करु शकतो, त्याला ढोबळमानाने नेता म्हणता येते.

तर "नेतृत्व म्हणजे अशी पध्दती की, ज्याच्यामध्ये पुढारी विशिष्ट संदर्भात आपल्या शैलीद्वारा प्रभाव तथा शक्तीचा उपयोग करतात" ही व्याख्या व्यक्तीवाचक आहे.

अधुनिक भारतीय नेतृत्व :-

(Modern Indian Political Leadership)

इंग्रज भारतात आले आणि वेगळे राज्यपध्दती, आधुनिक शिक्षण, नवनविन दळणवळणाची साधने, नवनविन अर्थव्यवस्था यामुळे भारताचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक जीवनच ढवळून निघाले. त्याच परिस्थितीतून राजाराम मोहन रॉय, जोतिबा फुले, दादाभाई नौरोजी, न्या.रानडे इ. नेत्यांची पिढी, समाजाच्या भवितव्याचा विचार करु लागली. अशा रितीने संपूर्ण देशाच्या, समाजाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक प्रश्नांची जाहीरपणे चर्चा करण्याची प्रथा सुरु झाली. म्हणून हे नवे पर्व म्हटल्या जाते. यात महत्वाची बाब म्हणजे देशाचे नेतृत्व सामाजिक प्रश्नाचा विचार करताना अधूनिक ज्ञानसंपदा व इतिहासाचा उपयोग करु लागले. लोकांमधूनच नव्या शिक्षणातून नव्या जाणिवा निर्माण झालेले लोकनेते समाजाचे भवितव्य घडविण्याची जबाबदारी स्विकारुन देशव्यापी संघटणा निर्माण करु लागले. या नेत्यांनी फ्रेंच राज्यक्रांती व अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दाच्या स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय ह्या घोषवाक्याबरोबरच नवनवे आर्थिक सिध्दांत व राज्यकारभाराच्या पध्दतीचा विचार सुरु केला.

याच काळात इंग्रजी शिक्षणाने दिपून गेलेल्या नवशिक्षितांचा एक वर्ग पुढे आला. त्यात सर्वप्रथम राजाराम मोहन रॉय भारावलेले नेते होते. त्यांनी नवविद्येचा आधार घेवून धार्मिक, सामाजिक व राजकीय सुधारांची चळवळ उभारली. त्यांनी विचार स्वातंत्र्य व मुद्रन स्वातंत्र्याची मागणी केली. स्त्री स्वातंत्र्यासाठी चळवळी केल्या. आपल्या चळवळीला अधूनिक ज्ञान व ध्येयनिष्ठेची जोड दिली. 'ब्राम्हो समाजाची १८२८ मध्ये स्थापना करुण चळवळीस दिशा दिली. "त्यातून जी राष्ट्रवादी प्रवृत्तीची, बुध्दीवादी मानवतावादाची व व्यापक बंधूभावावर आधारित विश्वबंधूत्वाची सुरुवात झाली. त्यामूळे अधूनिक भारताची वैचारिक पहाट उगवली.

सामाजिक सुधारणा व बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी झटणारे महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांची महाराष्ट्राच्या जडणघडणीवर बरीच छाप पडली आहे. शेतकऱ्यांच्या वतीने ब्रिटीश शासनापर्यंत नेतृत्व जरी महाराष्ट्रापुरते सीमीत असले तरी जनसामान्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करुन भारतात आपली एक वेगळी प्रतिमा निर्माण केली.

न्यायमूर्ती रानडे व दादाभाई नौरोजी हे जवळजवळ समकालीन होते. रानडे हे चौफेर बुध्दी असणारे, उपाययोजना सुचविणारे, विधायक वृत्तीचे, त्यासाठी संघटन वृत्ती देण्याची क्षमता असणारे नेतृत्व होते. त्यांना भारताच्या दारिद्र्याविषयी पूर्ण कल्पणा होती. दादाभाईनी भारताच्या दुरावस्थेसाठी इंग्रजांना जबाबदार धरले. तर रानडे यांनी देशाच्या आर्थिक नियोजनावर भर दिला. भांडवल संचय व सुवर्ण नियंत्रणावर त्यांनी विचार मांडले. म्हणून कोयाजी यांनी न्या.रानडे यांना 'कौटिल्या नंतरचा पहिला भारतीय अर्थशास्त्रज्ञ' असा गौरव केला. न्यायमूर्तींचे हे विचार ॲडम स्मिथला प्रतिक्रीया म्हणून उत्पन्न झाले.

डिसेंबर १८८५ मध्ये काँग्रेसच्या स्थापनेत न्या.रानडेंपेक्षाही दादाभाई नौरोजी यांनी आर्थिक नि:सारणाचा सिध्दांत मांडून भारताची लवलूट कशी केली जाते याचे सविस्तर वर्णण केले आहे. गोखले व टिळक हे महान पुढारी समकालीन असले तरी दोघांच्या भूमिका भिन्न होत्या. गोखले हे मवाळ विचारांचे तर टिळक हे जहाल विचारांचे होते. इंग्रजांच्या न्यायबुध्दीवर त्यांचा विश्वास नव्हता. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतु:सुत्रीचा केसरी व मराठा या वर्तमानपत्राद्वारे त्यांनी धडाक्याने प्रचार सुरु केला होता. त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणतात. 'नेतृत्वाच्या दृष्टीने धडाडी, स्वार्थत्याग, कष्टाळूपणा, राजकीय मुत्सद्देगीरी, व्यावहारी दृष्टी, आत्मसंयम, संघटण कौशल्य, कुशाग्र बुध्दी, दुरदर्शीपणा इ. टिळकांच्या गुणांचा योगी अरविंद घोष यांनी गौरव केला. गांधीजीना तर ते हिमालयाप्रमाणे उत्तुंग वाटत.

भारताच्या अधूनिक राजकीय नेतृत्वामध्ये महात्मा गांधी यांचे नेतृत्व आगळे-वेगळे आहे. सन १९१६ मधील बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या उद्घाटन समारंभामध्ये केलेली भाषणाने देशात खळबळ निर्माण झाली. त्यानंतर निळीच्या मळेवाल्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी संघर्ष, खेडा जिल्ह्यातील सारांबंदीची चळवळ, यामूळे भारतीय स्वातंत्र्य अंदोलनाचे नेतृत्व हळूहळू गांधीजींकडे आले. भाषण स्वातंत्र्यविरोधी रौलेट बिलाच्या विरुध्द गांधीजींनी जेव्हा सत्यागृह सुरु केला त्यास टिळकांनी देखिल प्रोत्साहन दिले. त्यानंतर टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीजी स्वातंत्र्य अंदोलनाचे सर्वमान्य नेते बनले. खिलाफत चळवळीला पाठबळ दिल्याने अलिबंधू त्यांच्या जवळ आले. गांधीजींना



Scanned with CamScanner

इंग्रज सरकारशी असहकार चळवळ, बहिष्कार, सविनय कायदेभंग चळवळ, सत्याग्रह इ. कार्यांमुळे व्यापक जनसमर्थन लाभले. खादीला मान मिळाला. चरखा, ग्रामसफाई, अस्पृश्योध्दार, सत्याग्रह, सत्य, अहिंसा, उपोषण इत्यादींमुळे, लौकिकपेक्षा नैतिक निर्माण होवून सर्व मान्यवर नेते त्यांना मानू लागले. शांततामय व कायदेशीर मार्गाने स्वराज्य प्राप्त करणे हे ध्येय निश्चित झाले.

सरदार वल्लभभाई पटेल हे कट्टर राष्ट्रवादी आणि हिंदूत्वाचा अभिमान असणारे, दृढ स्वभावाचे राजकीय मुत्सद्दी नेते होते. ते भारताचे पहिले गृहमंत्री होते. अतिशय साक्षेप आणि खंबीरपणे पाउल उचलून ५६१ संस्थाने त्यांनी भारतात विलीन करून टाकली. त्यांना 'लोहपुरुष' म्हणून जर्मनीच्या बिस्मार्कची उपमा दिली जाते. नेहरूजींनी मात्र काश्मिर तथा तिबेटच्या बाबतीत अव्यावहारी व दूरदर्शी भूमिका घेऊन 'राष्ट्रीय गुंता' करून ठेवला. म्हणून पाकिस्तान व चिनने भारतावर आक्रमन करून हजारो चौरस मैलाचा प्रदेश बळकावला. परराष्ट्रीय धोरणात पंडित नेहरूवर समाजवादाचा पगडा असल्याने 'अमेरिकेवर अनावश्यक ताण, रशियाकडे झुकाव व चिनला भाव असे धोरण होते. नेहरूजींपेक्षा त्यांच्या कन्या इंदिरा गांधी ह्या अधिक वास्तववादी होत्या. परंतु एकूण ध्येयधोरणाच्या बाबतीत कॉंग्रेसी नेतृत्व हे नेहरू मॉडेलचा परिणाम होय.

थोडक्यात वरचे पुढारी बदलले असले तरी कॉंग्रेसमध्ये कोणताही गुणात्मक बदल झाला नाही. म्हणून नंतरच्या काळातील कॉंग्रेसी नेतृत्वाच्या व्यक्तीगत काही लकबी सोडल्या बरेचसे सातत्य आहे. एकूण विचार केल्यास कॉंग्रेसचा इतिहास हा भारताच्या राजकीय नेतृत्वाच इतिहास आहे.

**संदर्भ सूची :-**


१) कंगले र.प. कौटिल्याचे अर्थशास्त्र

२) डॉ. खोकाळे ना.रा. 'राजकीय नेतृत्व' मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९९ (पृ.क्र.४)

३) डॉ. जोशी सुधाकर : पाश्चिमात्य राजकीय विचारवंत विद्या बुक पब्लिशर्स २००९ (पृ.क्र.९९)

४) Ebenstain, Great political thinker, oxford 1979 (Page No.17)

५) खेडकर अरुंधती (the prima मराठी अनुवाद) साहित्य अकादमी, नवी दिल्ली (पृ.क्र.५४)

६) डॉ.खोकाळे ना.रा. 'राजकीय नेतृत्व' मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९९ (प्र.क्र.५)




Scanned with CamScanner